# पीकेएलच्या १२ व्या हंगामात पहिल्यांदाच गोल्डन रेडने लागला निकाल! थरारक सामन्यात दबंग दिल्लीचा दमदार विजय

विशाखापट्टणम ४ सप्टेंबर, २०२५: प्रो कबड्डी लीग स्पर्धेतील १२ व्या हंगामातील १४ वा सामना पुणेरी पलटन आणि दबंग दिल्ली या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्याचा निकाल गोल्डन रेडने लागला. सचिनच्या एका चुकीमुळे सामना २८- २८ ने बरोबरीत सुटला. टाय ब्रेकरमध्येही दोन्ही संघ ५- ५ ने बरोबरीत राहिले. त्यामुळे सामन्याचा निकाल हा गोल्डन रेडने लागला. गोल्डन रेडमध्ये दबंग दिल्ली संघाने बाजी मारली.

पुणेरी पलटनकडून पहिली चढाई करताना अस्लम इनामदारने १ गुण घेत दमदार सुरुवात केली. दबंग दिल्ली संघाला पूर्वार्धातील ३ मिनिटापर्यंत एकही गुण घेता आला नव्हता. अखेर चौथ्या मिनिटाला पंकज मोहितेची यशस्वी पकड करून दबंग दिल्लीने आपलं खातं उघडलं.

पूर्वार्धातील सुरुवातीचे १० मिनिटे पूर्ण झाल्यानंतर दबंग दिल्लीने ८- ६ गुणांसह २ गुणांनी आघाडी घेतली. पूर्वार्धातील १२ व्या मिनिटाला पुणेरी पलटनने आशू मलिकला सुपर टॅकल करत गुण ८- ८ ने बरोबरीत आणले. पूर्वार्धातील १८ व्या मिनिटाला पुणेरी पलटनचा संघ पहिल्यांदा ऑल आऊट झाला. यासह दबंग दिल्लीने १६-११ गुणांसह ५ गुणांची आघाडी घेतली. दबंग दिल्लीने ही आघाडी पूर्वार्धातील शेवटच्या मिनिटापर्यंत कायम ठेवली. १८- १३ गुणांसह दबंग दिल्लीने पूर्वार्धात ५ गुणांची आघाडी घेतली.

पूर्वार्धात पिछाडीवर असलेल्या पुणेरी पलटनने उत्तरार्धात दमदार सुरुवात केली. उत्तरार्धातील ७ व्या मिनिटाला दबंग दिल्लीचा संघ पहिल्यांदा ऑलआऊट झाला. यासह पुणेरी पलटनने २२-२१ गुणांसह १ गुणाची आघाडी घेतली.

पूर्वार्धात पुणेरी पलटनचा संघ ५ गुणांनी पिछाडीवर होता. पण उत्तरार्धात पुणेरी पलटनने दमदार पुनरागमन केलं. शेवटी दोन्ही संघांमध्ये अटीतटीची लढत रंगली. पण पुणेरी पलटनने आपली आघाडी शेवटपर्यंत कायम ठेवली. उत्तरार्धातील शेवटच्या मिनिटाला दिल्लीने बरोबरी साधण्याच्या पूर्ण प्रयत्न केला. पुणेरी पलटनचा संघ १ गुणाने आघाडीवर असताना सचिनने शेवटची चढाई करण्यासाठी ३० सेकंदाहून अधिकचा वेळ घेतला. त्यामुळे सामना २८- २८ ने बरोबरीत सुटला.

## गोल्डन रेडने लागला निकाल

टाय ब्रेकरच्या पहिल्या चढाईत आदित्य शिंदेने एक गुण घेत पुणेरी पलटनला दमदार सुरुवात करून दिली. ५ पैकी ३ चढाई झाल्यानंतर दोन्ही संघांचे गुण ३- ३ ने बरोबरीत होते. शेवटी टाय ब्रेकर देखील ५- ५ ने बरोबरीत राहिला. त्यानंतर गोल्डन रेड झाली. गोल्डन रेडमध्ये आशू मलिकने २गुण घेत दबंग दिल्ली संघाने बाजी मारली.

या दिवसातील पहिल्या सामन्यात जयपूर पिंक पँथर्स आणि तेलुगू टायटन्स हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात तेलुगू टायटन्स संघाने ३७-३२ ने आपल्या नावावर केला.